<u>प्रेस नोट</u>

दिनांक ०८/१०/२०१७ रोजी शिवाजीनगर पोलीस ठाणे हद्दीत सागर ज्वेलर्स शिवाजी चौक शिवमंदीर रोड, प्लॉट क. ६१४ अंबरनाथ पुर्व येथील ज्वेलर्स दुकानातील ऑफीसमधील खीडकीच्या बाहेरील लांखंडी दरवाजाचे कुलुप कटावणीने तोडुन , खीडकीचे ग्रील कशानेतरी कापुन व बेंड करून कोणीतरी अज्ञात चोरटयाने आत प्रवेश करून सोन्याचे दागीने व दोन मोबाईल असे २,३६,७०,०००/- रु. किमतीचे घरफोडी चोरी केली म्हणुन शिवाजीनगर पोलीस ठाणे गुन्हा नोंद कमांक I २६६/२०१७ भा.दं.वि. कलम ४५४, ३८० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस आयुक्त सो. श्री. परमबिर सिंग व मा. पोलीस सह आयुक्त श्री. मधुकर पांडे , मा. अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग कल्याण श्री. प्रतावराव दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस उप आयुक्त श्री. अंकित गोयल यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सपोआ अंबरनाथ श्री सुनील पाटील, शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे वपोनि श्री. दिलीप गोडबोले, पोनि (गुन्हे)पाटील अंबरनाथ पोस्टे, पोउनि डांगे, ॲटी रॅाबरी पथकाचे पोलीस उप निरीक्षक श्री. येवले व स्टाफ, ॲन्टी मोबाईल स्नॅचिंग पथकाचे पोउनि श्री. आव्हाड व पथक, पोलीस उप आयुक्त कार्यालयातील पोलीस उप निरीक्षक(वाचक) दिनेश पाटील, पोलीस उप निरीक्षक विलास सानप व स्टाफ अश्या अधिकारी व कर्मचारी यांची वेगवेगळी पथके तयार करून सदर गुन्हा उघडकीस आणणेकरीता गुप्त बातमीदाराचे मदतीने तसेच तांत्रीक कौशल्याचा वापर करून गुन्हयातील मुख्य आरोपी नामे विनोद रामबली सिंग वय ४९ रा.तन्वर बिल्डींग रुनं ३०२, ३ रा माळा,दिपक हॉस्पीटल रोड, मिरा रोड यास त्याचे राहते घरातुन अटक करून त्याचेकडुन ३ सोन्याच्या लगडी त्याचे वजन २ किलो ३८० ग्रॅम त्याची किमंत सुमारे ६२,९९,५२९/- रुपये व सोन्याचे विविध दागीने त्याचे वजन सुमारे ८३८.०९० ग्रॅम त्याची किंमत सुमारे २५,९५,२८९ /-।रुपये व रोख रक्कम ४,५०,०००/- रुपये तसेच आरोपीत पारस छबीलदास जुबेलीया वय ४५ वर्षे, धंदा दलाली रा. घर नं २/२५ केसरबाग, एलटी रोड बोरीवली प.,मुंबई ९२ याचेकडुन ०६ सोन्याचे लगडी त्याचे वजन सुमारे ३०५१.२१० ग्रॅम वजनाचे त्याची किंमत ८१,७०,९९२/- रुपये असा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला.

सदर गुन्हयात एकुण दोन आरोपीताना अटक करून त्यांचेकडुन सुमारे ०६ किलो २६९ ग्रॅम त्याची किंमत १,७०,६५,७४०/-रुपये व रोख रक्कम ४,५०,०००/- रुपये असा मुददेमाल जप्त करून गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

---


महाराष्ट्र पोलीस


महाराष्ट्र पोलीस


Saga
Jewelle
Shivaji Chowk
WhatsApp Image 2017-10-14 at 1.14.38 PM (1).jpeg (1280 x 720)
Edit in Picasa
Upload